# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना, संक्षिप्त अहवाल
## शैक्षणिक वर्ष : २०१९–२०

**विद्यापीठाचे नाव : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ** **एसटीडी कोड : ०२०**

**संपर्क : दुरध्वनी क्रमांक : ०२०–२५६९७३४१, ०२०–२५६०११५३**

**फॅक्स कमांक : –**

**ई–मेल :** nss@unipune.ac.in, nss@pun.unipune.ac.in

**स्वयंसेवक संख्या : एकूण : ४७७५०** **मुले : २४२००** **मुली : २३५५०**

| कार्यक्रम अधिकारी जिल्हानिहाय | एकूण | स्त्री | पुरूष | प्रशिक्षित | अप्रशिक्षित |
|---|---|---|---|---|---|
| पुणे शहर | २२९ | ६८ | १६१ | ४१ | १८८ |
| पुणे ग्रामीण | १७० | ३५ | १३५ | ३४ | १३६ |
| अहमदनगर | १६२ | ३० | १३२ | ४७ | ११५ |
| नाशिक | १७३ | ३४ | १३९ | ४४ | १२९ |
| | ७३४ | १६७ | ५६७ | १६६ | ५६८ |

**नियमित कार्यक्रम :**

| उपक्रम | स्वयंसेवक संख्या | उद्दिष्टांचे साध्य |
|---|---|---|
| • पल्स पोलिओ लसीकरण | 5,118 | 15,712 |
| • आपत्ती व्यवस्थापन | 37,500 | 37,500 |
| • आरोग्य विषयक शिबिरे | 9754 | 9754 |
| • रक्तदान | 17877 | 13899 Bottle |
| • वृक्षारोपण | 25473 | 37622 Tree Plantation |
| • Gunnies World Record of Largest Neem Tree Sapling Distribution on 23 June 2019 @ SPPU Campus | 20000+ | 16661 Neem Tree Sapling Distribution |
| • स्वच्छता अभियान (शहरी भागातील उपक्रम) | | |
| 1) प्लॅस्टिक निर्मूलन | | |
| 2) ओला कचरा व सुका कचरा यांचे वर्गीकरण करुन गांडुळ खतासाठी प्रोत्साहित करणे (किती प्रकल्प तयार झाले) | | |
| 3) गलिच्छ वस्त्यांमध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य व स्वच्छता याविषयी जनजागृती करणे (किती रॅली काढण्यात आल्या) | | |
| 4) मलेरिया, डेंग्यू, स्वाईन फ्लू याबाबत प्रचार व प्रसाराची मोहिम हाती घेणे (किती आरोग्य शिबीरे /रॅली/पथनाटय घेण्यात | | |

| | | |
|---|---|---|
| आले) | | |
| 5) दत्तक घेणे | | |
| a) रेल्वे स्टेशन | | |
| b) बस स्टॅण्ड, | | |
| c) धार्मिक स्थळे | | |
| d) थोर पुरुषांचे पुतळे | | |
| e) तलाव | | |
| 6) आपल्या शहराला स्मार्ट व्हिलेजच्या स्पर्धेत भाग घेण्यास प्रवृत्त करणे. | | |
| 7) शहरी भागातील धार्मिक उत्सवाच्या दरम्यान व तद्नंतर स्वच्छता मोहिम राबविणे. (उपक्रमांची संख्या) | | |
| 8) स्वच्छतेबाबत माहितीपट तयार करुन प्रचार व प्रसार करणे. (किती माहितीपट तयार झाले) | | |
| 9) ब्लू रिबन क्लब तयार करणे व त्यांच्यामार्फत शहरी भागातील नगरपालिका व महानगरपालिका यांना सचेत करणे. (ब्लू रिबन क्लबची संख्या) | | |
| • **स्वच्छता अभियान (ग्रामीण् भागातील उपक्रम)** | | |
| 1) देवराई व वनराई यांची निर्मिती करणे. (किती निर्मिती केली) | | |
| 2) **संवर्धन व सुशोभीकरण करणे** | | |
| a) गड किल्ले | 22,450 | - |
| b) ऐतिहासिक स्थळे | 4560 | 5000 |
| c) पर्यटन स्थळे | | |
| 3) पाण्याच्या स्रोताच्या विविध ठिकाणांची स्वच्छता करणे. | | |
| 4) प्राथमिक शाळांची स्वच्छता, आरोग्य तपासणी, गोठा स्वच्छ ठेवण्याबाबत प्रचार व प्रसार करणे. | | |
| 5) कंपोस्ट खत तयार करण्यास प्रवृत्त करणे. (किती कंपोस्ट खत) | | |
| 6) सांडपाण्याचे व्यवस्थापन किंवा शोष खड्डे तयार करणे. ( किती शोष खड्डे तयार केले) | | |
| • वणवा मुक्त शिवार तयार करण्यासाठी प्रचार व प्रसार करणे. | | |
| • **रस्ता सुरक्षा** - हरित महामार्ग तयार करण्यासाठी वृक्षारोपण, सुशोभीकरण व जैव विविधता संधारण करणे आणि दत्तक रस्त्यावर अपघात होणार नाही यासाठी रस्ता सुरक्षा अभियान | | |

| | | |
|---|---|---|
| राबविणे. | | |
| • **स्वस्थ भारत अभियान-** | | |
| 1) आरोग्य पत्रक (Health Card)सर्वच घरांमध्ये असेल,याचे सर्वेक्षण करणे. | | |
| 2) प्रत्येक कुटुंबांचे 3000 गावांचे 100 टक्के आरोग्य पत्रक तयार करणे. | | |
| 3) 3000 गावांमध्ये कुपोषित बालक शोधून गाव कुपोषीत मुक्त करणे. | | |
| 4) शासनाच्या विविध आरोग्य सेवा व सुविधांचा प्रचार व प्रसार करणे. | | |
| 5) आरोग्य शिबिरे आयोजित करणे. | 35,850 | |
| 6) महिलांच्या आरोग्याबाबत उपक्रम राबविणे. | | |
| 7) कर्करोगाविषयी जनजागृती करून प्रतिबंधात्मक उपाय करणे. | | |
| 8) योगाचा प्रचार व प्रसार करणे. | 4500 | |
| 9) तणावमुक्त जीवनशैली निर्माण करण्यासाठी योगा शिबिरे आयोजित करणे. | | |
| 10) शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी मानसोपचार तज्ञांद्वारे समुपदेशन करणे. | | |
| 11) कृषी महाविद्यालयांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी पीक रचनेमध्ये बदल करणे तसेच दुय्यम जोड व्यवसाय सुरू करण्यास प्रवृत्त करणे. | | |
| 12) पशुधन व्यवसायासाठी प्रोत्साहित करणे इ. उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत बदल करणे. | | |
| **13) विशेष भर देणे.** | | |
| a) अवयवदान | | |
| b) नेत्रदान | | |
| c) रक्तदान | | |
| • <u>बेटी बचाओ बेटी पढाओ -</u> | | |
| 1) स्त्री भृण हत्या प्रतिबंध. | 19,500 | - |
| 2) कन्या जन्मदर वाढविण्यासाठी प्रचार व प्रसार करणे. | | |
| 3) पथनाट्य, पोस्टर, प्रदर्शन तसेच स्पर्धा आयोजित करणे. | | |
| 4) मुलींच्या शिक्षणाबाबत सुविधा, त्याबाबतच्या शासनाच्या योजना याविषयी जनजागृती करणे. | | |

| | | |
|---|---|---|
| 5) दत्तक गावातील मुले शाळाबाहय राहणार नाहीत याची खबरदारी घेणे. | | |
| 6) शैक्षणिक सुविधा, स्कॉलरशिप, रोजगार, स्वयंसहायता बचत गट, कौशल्य विकास आधारित महिला बचत गटांना सक्षम करणे. | | |
| 7) कौटुंबिक वातावरण व रोजगार यांचा मेळ घालत असताना मानसिक ताणतणाव नाहीसे करण्याबाबत समुपदेशन. | | |
| 8) स्त्री पुरुष मैत्री या संकल्पनेवर अधिक जाणीवपुर्वक समुपदेशन करणे. | | |
| 9) निर्भय कन्या योजनेअंतर्गत स्वसंरक्षणाच्या योजनांबाबत प्रशिक्षण घेणे. | | |
| 10) कौटुंबिक मूल्य संवर्धनासाठी व वृध्दीगत होण्यासाठी जाणीव निर्माण करणे. | | |
| • **डिजीधन-** | | |
| 1) संगणकीय साक्षरता निर्माण करणे. | | |
| 2) डिजिटल साक्षरता निर्माण करण्यासाठी डिजिटल लॉकर तयार करणे. | | |
| 3) भिम अॅपचा प्रचार व प्रसार करणे. | | |
| 4) बँकेच्या सहकार्याने वित्तीय साक्षरता अभियानाअंतर्गत (विशाखा) कॅशलेस महाराष्ट्र स्वयंसेवक निर्माण करण्याकरिता अनुलोन संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आयोजित करणे. | | |
| ५) जिल्हा अग्रणी बँकेच्या सहाय्याने प्रशिक्षण आयोजित करणे. यामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा समावेश करणे इ. (मुद्रा, स्टार्ट अप) | | |
| ६) जिल्हा अग्रणी बँकेमार्फत डिजीधन योजना यशस्वी करण्याकरिता आर्थिक सहकार्य मिळविणे. | | |
| ७) जनधन योजनेअंतर्गत सर्व नागरिकांचे बँकेत खाते उघडणे, त्याला आधारकार्ड लिंक करून के.वाय.सी. करणे, पंतप्रधान सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना याबाबत प्रचार व प्रसार करणे व सहभागी करून घेणे. | 13450 | |

**विशेष शिबिरे** : एकूण संख्या : 23875 स्वयंसेवक : मुले . 12100 मुली . 11775

१) एप्रिल व मे मध्ये सी.सी.टी. चे काम पूर्ण करावे व जून, जुलै किंवा ऑक्टोबर मध्ये वृक्ष लागवड करुन त्यांचे 100 टक्के संवर्धन होईल यासाठी आराखडा तयार केला असल्यास थोडक्यात विवरण.

२) पाणी फाऊंडेशन सोबत किंवा त्यावर आधारित शिबिरांची संख्या.

३) पाणी प्रश्नावर रासेयोतील मुलांनी व महाविद्यालयांनी काम करणे अपेक्षित आहे. सन २०१9-20 मध्ये घेतलेली पाण्यासाठी शिबीरे :-

a) किती सलग  समपातळी चर (CCT) उपक्रम  राबविले.

b) किती वनराई बंधारे बांधले.

c) किती गॅबीयन बंधारे बांधले.

d) किती कोल्हापूर बंधारे बांधले.

e) किती पारस बाग तयार केली.

| क्र. | शिबिराचे नाव | आयोजक महाविद्यालय | स्वयंसेवक संख्या व कालावधी | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय सलग समपातळी चर प्रशिक्षण शिबिर | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इंदापूर | ३००/५ दिवसीय | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इंदापूर |
| २ | 'सलग समपातळी चर (सीसीटी) खुदाई प्रशिक्षण शिबिर' (विद्यापीठस्तरीय) | शिक्षण प्रसारक संस्थेचे संगमनेर न.पा. आर्ट्स, डी.जे. मालपाणी कॉमर्स अँड बी. एन. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर, अहमदनगर | १००/७ दिवसीय | सावरगाव तळ, ता. संगमनेर, जि. अहमदनगर |
| | आदिवासी अभ्यास आणि त्यांच्या विकासात तंत्रज्ञानाचा उपयोग (विद्यापीठस्तरीय) | विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी बिबवेवाडी, पुणे | १००/४ दिवसीय | वनवासी कल्याण आश्रमशाळा, गुही, ता. सुरगाणा, जि. नाशिक |
| | संवाद व सहवास कार्यशाळा (विद्यापीठस्तरीय) | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इंदापूर | ३००/५ दिवसीय | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इंदापूर |
| | पर्यावरण व गडसंवर्धन सायकल रॅली शिबिर (विद्यापीठस्तरीय) | शिक्षण प्रसारक संस्थेचे संगमनेर न.पा. आर्ट्स, डी.जे. मालपाणी कॉमर्स अँड बी. एन. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर, अहमदनगर | २१०/५ दिवसीय | संगमनेर-चंदनापूरी-घारगाव-आळेफाटा-नारायणगाव-जुन्नर-शिवनेरी-लेण्याद्री-ओझर-ओतूर-आळेफाटा-संगमनेर |
| | एक भारत श्रेष्ठ भारत पथनाट्य स्पर्धा (जिल्हास्तरीय) | ऑल इंडिया श्री शिवाजी मेमेरोअल सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय | २५०/१ दिवसीय | ऑल इंडिया श्री शिवाजी मेमेरोअल सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय |
| | राज्यस्तरीय एक भारत श्रेष्ठ भारत विशेष शिबिर | शिक्षण प्रसारक मंडळीचे सर परशुरामभाऊ महाविद्यालय, टिळकरोड, पुणे | ३००/७ दिवसीय | 'विद्यापीठ दत्तक गाव, मु.पो. वाघापूर, ता. पुरंधर, जि. पुण |
| | जिल्हास्तरीय सेंद्रीय शेती प्रकल्प अभ्यास सहल शिबिर | नवमहाराष्ट्र शिक्षण मंडळ शेवगावचे, कै. आबासाहेब काकडे कला महाविद्यालय, बोधेगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर | २००/१ दिवसीय | सह्याद्री ॲग्रो प्रॉडक्ट्स, नाशिक |
| | राज्यस्तरीय स्वच्छ भारत अभियान निसर्ग संवर्धन शिबिर | डॉ.डी.वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपरी, पुणे | ३००/७ दिवसीय | रतनगड, ता. अकोले, जि. अहमदनगर |
| | विद्यापीठस्तरीय सर्व रोग निदान व शस्त्रक्रिया कार्यशाळा | समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, राजूरी संस्थेचे समर्थ ग्रुप ऑफ | २३०/१ दिवसीय | समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, राजूरी संस्थेचे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (आरोग्य शिबिर) | इन्स्टिट्युशन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, बेल्ह | | समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, बेल्ह |
| | व्यसनमुक्ती विषयावर एक दिवसीय कार्यशाळा (जिल्हास्तरीय) | ऑल इंडिया श्री शिवाजी मेमेरोअल सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय | २००/१ दिवसीय | ऑल इंडिया श्री शिवाजी मेमेरोअल सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय |
| | व्यसनमुक्ती विषयावर एक दिवसीय कार्यशाळा (जिल्हास्तरीय) | मराठा विद्या प्रसारक समाज, कर्मवीर शांताराम बापू कोंडाजी वावरे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नाशिक | २००/१ दिवसीय | मराठा विद्या प्रसारक समाज, कर्मवीर शांताराम बापू कोंडाजी वावरे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नाशिक |

**उत्कर्ष : सामाजिक - सांस्कृतिक सहभाग, माहिती**

९+९,+१, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, दिनांक. २८ ते ३१ जानेवारी २०२० (सवर्साधारण उपविजेतेपद)

**पुरस्कार प्राप्त : रासेयोला प्राप्त झालेल्या पुरस्कारांची माहिती**

उत्कर्ष - राज्यस्तरीय सांस्कृतिक व सामाजिक स्पर्धा, सवर्साधारण उपविजेतेपद, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, दिनांक. २८ ते ३१ जानेवारी २०२०

**राज्यस्तरीय उत्कृष्ठ कार्यक्रम पुरस्कार**, डॉ. विलास उगले, सर परशुराम महाविद्यालय, टिळक रोड पुणे

**राज्यस्तरीय उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार**, सर परशुराम महाविद्यालय, टिळक रोड पुणे

**राज्यस्तरीय उत्कृष्ठ स्वयंसेवक पुरस्कार**, कु. देवानंद भालेराव, वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड

**राष्ट्रीय एकात्मता शिबिरे सहभाग व माहिती :**

३+३+१, बँगलोर सेंट्रल विद्यापीठ, बँगलोर, दिनांक: २० ते २७ सप्टेंबर २०१९

**साहसी क्रीडा शिबिरे / मेगा शिबिरे सहभाग :**

४+४+२=१०, नॅशनल अॅडव्हेंचर फाउंडेशन नाफ चॅप्टर, चिखलदरा, अमरावती, दिनांक : २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२०

**२६ जानेवारी २०२० राष्ट्रीय प्रजासत्ताक संचलन दिन, नवी दिल्ली येथे सहभाग:**

२६ जानेवारी २०२० राष्ट्रीय प्रजासत्ताक संचलन दिन, नवी दिल्ली , १ स्वयंसेवक सहभागी

**२६ जानेवारी २०२० राज्यस्तरीय प्रजासत्ताक संचलन दिन, मुंबई येथे सहभाग:**

२६ जानेवारी २०२० राज्यस्तरीय प्रजासत्ताक संचलन दिन, मुंबई , १३ स्वयंसेवक सहभागी

**आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभाग :**

कु. दर्पेक्ष डिंगर, सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, आंतरराष्ट्रीय युवक प्रतिनिधी आदान प्रदान कार्यक्रम, चायना

कु. शैलेश पाथरकर, न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहमदनगर, आंतरराष्ट्रीय युवक प्रतिनिधी आदान प्रदान कार्यक्रम, चायना

**कार्यक्रम अधिकारी / जिल्हा समन्वयक / कार्यक्रम समन्वयक यांच्या पुढाकाराने आयोजित केलेले विशेष उपक्रम :**

**रासेयो व स्वयंसेवी संस्था संयुक्तिक उपक्रम माहिती :..**

| | |
|---|---|
| १ | मा. क्षेत्रीय संचलनालय, पुणे व मा. राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो कक्ष, मंत्रालय कक्ष, मुंबई आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना संलग्नीत महाविद्यालयामधील रासेयो कार्यक्रम अधिकारी व स्वंयसेवक यांच्या सहभागाने दि. २७ मे २०१९ रोजी, संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे याठिकाणी तंबाखूमुक्त राष्ट्रीय अभियान राबविण्यात आले. या अभियानात पुणे शहर व ग्रामिण भागातून २०० रासेयो कार्यक्रम अधिकारी आणि रासेयो स्वंयसेवक सहभागी झाले होते. |
| २ | मा. राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो यांनी कळविल्यानुसार आणि मा. राज्यपाल यांचे सचिव यांनी निर्देशित केल्यानुसार सन २०११—१२ या शैक्षणिक वर्षापासून 'आव्हान' राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर रासेयो स्वंयसेवकांसाठी आयोजित करण्याचे निश्चित केले, त्यानुसार सन २०१९—२० या शैक्षणिक वर्षातील 'आव्हान—२०१९' राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड' या ठिकाणी दि. ३ ते १२ जून २०१९ दरम्यान आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा ९० स्वंयसेवक आणि ६ कार्यक्रम अधिकारी असा संघ सहभागी झाला होता. |
| ३ | रासेयो कक्ष, महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या समन्वयातून स्वच्छ वारी—स्वस्थ वारी—निर्मलवारी—हरितवारी महासंकल्प अभियान अतंर्गत "गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड" कार्यक्रम दि. २३ जून २०१९ रोजी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य क्रीडांगणावर आयोजित करण्यात आला होता. स्वच्छ वारी—स्वस्थ वारी—निर्मलवारी—हरितवारी अभियानाअंतर्गत २० हजार विद्यार्थ्यांना कडुनिंब या एकाच प्रजातीच्या रोपांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास मा. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. चंद्रकांत पाटील, पालकमंत्री, पुणे जिल्हा, मा. मुक्ता टिळक, महापौर, पुणे, डॉ. अतुल साळुंखे, राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो, डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. एन. एस. उमराणी प्र—कुलगुरू, डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. डी. कार्थिगेन, क्षेत्रीय संचालक, पुणे, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य व मा. अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, प्रभाकर देसाई संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्रशासकिय अधिकारी व कर्मचारी हे उपस्थिती होते. |
| ४ | २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून संयुक्त राष्ट्रसंघांच्या महासभेत घोषत करण्यात आला आहे. त्यानुसार मा. सचिव, युवा कार्यक्रम विभाग खेल मंत्रालय, भारत सरकार व मा. सचिव, युवा कार्यक्रम विभाग आणि खेल मंत्रालय, भारत सरकार व मा. क्षेत्रीय संचालक, क्षेत्रीय संचालनालय, भारत सरकार, यांनी पाठविलेल्या पत्रानुसार २१ जून २०१९ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या निमित्ताने रासेयो स्वंयसेवकांनी योगासनांविषयी जनजागृती केली. तसेच पुणे—पिंपरी चिंचवड शहरातील महाविद्यालयांच्या १०० रासेयो स्वंयसेवकांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या ठिकाणी डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू आणि डॉ. एन. एस. उमराणी, उपकुलगुरू यांच्या उपस्थित पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय योग दिवस कार्यक्रमात सहभाग घेतला होता. |
| ५ | दि.२२ जून ते १३ जुलै २०१९ दरम्यान 'स्वच्छ वारी—स्वस्थ वारी—निर्मलवारी—हरितवारी' संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी सोहळा वारी मार्गावर (आळंदी—देहु ते पंढरपूर) आयोजन करण्यात आले. स्वच्छ भारत अभियानांतर्गत संपूर्ण स्वच्छता, पत्रावळया वाटप, ओला कचरा व निर्माल्याचे संकलन, खत निर्मिती तसेच वारकऱ्यांची आरोग्य शिबिरातून सेवा सुश्रुषा व आवश्यक साधनांचे वाटप, वारकऱ्यांचे व गावकऱ्यांचे प्रबोधन आणि वारी मार्गावर कडुलिंबाच्या रोपाची लागवड व संगोपन करणे अशा स्वरूपांचे उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमातर्गत दोन्ही पालखी महामार्गावर ३४३६ रासेयो विद्यार्थ्यांच्या मदतीने यावर्षीच्या वारीमध्ये ४०० रासेयो स्वंयसेवक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना संलग्नीत महाविद्यालयातून सहभागी झाले होते आणि महाराष्ट्रातील विद्यापीठामधून ५० रासेयो स्वंयसेवक उपस्थित होते. |
| ६ | राज्यसंपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या पत्रान्वये दि. ११ जुलै २०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता तंबाखू व्यसनमुक्तीसाठी सामूहिक शपथ दिवस साजरा करावा, असे निर्देशित करण्यात आले होते. त्यानुसार रासेयो संलग्नीत सर्व महाविद्यालयांमध्ये सर्व विद्यार्थी व शिक्षक — शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सहभागातून तंबाखू व्यसनमुक्तीसाठी सामूहिक शपथ घेऊन जनजागृती करण्यात आली. या उपक्रमासाठी संबंध हेल्थ फाऊंडेशन, नवी दिल्ली यांच्याद्वारे एक गुगल ॲप तयार करण्यात आले आहे. यामध्ये सर्व महाविद्यालंयानी आयोजित केलेल्या उपक्रमांची नोंद केली आहे. |
| ७ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व पिंपरी—चिंचवड महानगरपालिका, सेवा सहयोग संस्था आणि देहू संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने हरितवारी उपक्रमातर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन निगडी येथील "भक्ती—शक्ती चौक ते देहूरोड" या परिसरामध्ये करण्यात आले होते. यामध्ये १००० रोपांची लागवड दि. २८ जुलै २०१९ रोजी करण्यात आली. यामध्ये पिंपरी—चिंचवड परिसरातील महाविद्यालयातील रासेयो स्वंयसेवक सहभागी झाले होते. |
| ८ | महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या निर्देशानुसार महाविद्यालयीन विद्यार्थी व समाजामध्ये एड्स संदर्भात जनजागृती होण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय युवा दिन (१२ ऑगस्ट) व राष्ट्रीय युवा दिन (१२ जानेवारी) आणि जागतिक एड्स दिन (१ डिसेंबर) निमित्त सर्व रासेयो महाविद्यालंयामध्ये उपक्रम राबविण्यात आले होते. यामध्ये रेड रिबन क्लब यांच्या सहकार्याने रासेयो स्वंयसेवकांद्वारे रॅली, निंबध, पोस्टर्स भाषण, व्याख्यानमाला, चित्रकला स्पर्धा, गटचर्चा इत्यादी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून करण्यात आले. तसेच रासेयो शिबिर कालावधीत एड्स संदर्भात विविध उपक्रमांच्या साहाय्याने व्यापक व प्रभावी जनजागृती करण्यात यावी असे सुचित करण्यात आले. |
| ९ | राज्य संपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष, मुंबई यांच्या निर्देशानुसार मा. प्रधानमंत्री, भारत सरकार यांच्याद्वारे निर्गमित केल्यानुसार दि. २९ ऑगस्ट २०१९ रोजी, सकाळी १०.०० वाजता रासेयो संलग्नीत सर्व महाविद्यालयामध्ये "सुदृढ |

| | |
|---|---|
| | भारत"(Fit India) अभियाना अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देशीत करण्यात आले होते. पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील रासेयो संलग्नीत महाविद्यालयांनी यामध्ये सहभाग घेतला होता. |
| १० | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व विभगिय प्रत्यारोपण समन्वय केंद्र, पुणे (Zonal Transplant Co-ordination Centre, Pune-ZTCC) यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील रासेयो संलग्नित महाविद्यालयांमध्ये अवयवदान उपक्रमाबाबत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये विभागीय प्रत्यारोपण समन्वय केंद्र, पुणे विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्ग सहभागी महाविद्यालयातील स्वयंसेवक, प्राध्यापक यांना अवयवदानाविषयी माहितिपट, पोस्टर्स व व्याख्यानाद्वारे जनजागृती करण्यात आली. या संदर्भत रासेयो महाविद्यालयानी विभागीय प्रत्यारोपण समन्वय केंद्र, पुणे यांना उपक्रम राबविण्याबाबत सहकार्य केले. |
| ११ | पोलीस उपआयुक्त (वाहतूक), पुणे शहर यांच्या अहवालानुसार पुणे शहरामधील वाहतुकीचा प्रश्न दिवसेदिवस गंभीर होत चालला आहे. वाहनाचे प्रमाण नागरिकांपेक्षा दुप्पट वाढलेले असून वाहन चालवण्याची अयोग्य सवय व निष्काळजीपणा या कारणांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. याकरिता रासेयो स्वयंसेवकांमार्फत समाजामध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने 'रस्ता सुरक्षा अभियान' अंतर्गत पथनाटय, रॅली, निबंध, पोस्टर्स भाषण, व्याख्यानमाला, चित्रकला स्पर्धा, गटचर्चा इत्यादी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून करण्यात आले. |
| १२ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने पुणे शहरामधील रासेयो महाविद्यालयीन स्वयंसेवकाकरिता ९ ऑगस्ट २०१९ रोजी क्रांतीदिनानिमित्त स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान अंतर्गत एकदिवशीय श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरामध्ये करण्यात आले होते. यामध्ये पुणे व पिंपरी चिंचवड शहरामधील रासेयो संलग्नीत महाविद्यालयांमधील २०० स्वंयसेवक सहभागी झाले होते. त्यांनी वृक्षारोपणाकरिता खड्डे खुदाई व वृक्षरोपण केले. |
| १३ | सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात महापूर आल्याने तेथील लोकजीवन विस्कळीत झाले या पार्श्वभूमीवर पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील ५०० रासेयो स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांच्या सहभागातून दि. २२ ते २८ ऑगस्ट २०१९ दरम्यान कोल्हापूर जिल्ह्यातील पाच व सांगली जिल्ह्यातील पाच अशा एकूण दहा गावांमध्ये सात दिवसीय शिबीरातून पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य करण्यात आले. या शिबिरास चिंचवड शहरातील नदी पात्रामध्ये एकुण १०,००० स्वंयसेवक व कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या सहभागातुन स्वच्छता अभियान राबवण्यात आले. डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. एन. एस. उमराणी, प्र—कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ.प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मा.व्यवस्थापन परिषद सदस्य व मा.अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. प्रभाकर देसाई, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यांनी भेटी दिल्या होत्या. |
| १४ | मा. क्षेत्रीय संचालक, भारत सरकार, युवा व खेल मंत्रालय, रासेयो, क्षेत्रीय संचलनालय, पुणे व सहाय्यक कार्यक्रम सल्लागार, रासेयो, भारत सरकार यांनी पाठविलेल्या पत्रानुसार दि. १ ते ३० सप्टेंबर २०१९ दरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, रासेयो संलग्नीत सर्व महाविद्यालयातील स्वंयसेवकांमार्फत पौगंडावस्थेतील विद्यार्थ्यांसाठी पोषण अभियान आयोजित करण्याचे निर्देशित केले होते. याकरिता महाविद्यालयातून रासेयो स्वयंसेवकांमार्फत समाजामध्ये व पौगंडावस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याकरिता उपक्रम राबविण्याचे सुचित केले. |
| १५ | राज्य संपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष, मुंबई यांच्या पत्रानुसार राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन मुंबई येथे घेण्यात येते. तसेच दिल्ली येथे राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलनाचे आयोजन करण्यात येते, त्यानुसार दि. १४ ते १६ सप्टेंबर २०१९ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या ठिकाणी आयोजित राज्यस्तरीय एस. आर. डी. व एन. आर. डी. निवड चाचणी शिबिरात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने २२ स्वंयसेवक व २२ स्वंयसेविका आणि २ संघनायक असा संघ सहभागी झाला. |
| १६ | मा. पंतप्रधान महोदय यांनी निर्देशित केल्यानुसार स्वच्छ भारत अभियानांतर्गत व मा. राज्यसंपर्क अधिकारी यांच्या निर्देशानुसार 'स्वच्छता ही सेवा' उपक्रमांतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त व महात्मा गांधी ह्यांच्या १५० व्या जयंती निमित्त दि. २ ऑक्टोबर २०१९ रोजी खालील उपक्रमांचे आयोजन पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील रासेयो संलग्नीत महाविद्यालयांमध्ये खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.<br>१.माहिती, शिक्षण आणि संपर्क अभियानांतर्गत जनजागृतीकरिता भित्तीपत्रक, घोषवाक्य, रॅली, पथनाट्य अशा स्वरूपाचे उपक्रम राबवणे.<br>२.राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी दत्तक गावातील ग्रामस्थांशी वैयक्तिक संपक साधून प्लॅस्टीक मुक्तीसाठी जनजागृती करणे.<br>३.महानगरपालिकेच्या सहकार्याने शहर विभागामध्ये शहरातील प्लॅस्टीक एकत्र जमा करण्यासारखे उपक्रम राबवणे आणि प्लॅस्टीक कचरा निर्मूलन करणे.<br>या अनुषंगाने 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमास अनुसरून राष्ट्रीय सेवा योजना सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त व महात्मा गांधीजींच्या १५० व्या जयंतीनिमित्त दि. २ ऑक्टोबर २०१९ रोजी, पुणे व पिंपरी—चिंचवड शहरातील नदीपात्रात साखळी पद्धतीने स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या मध्ये पुणे व पिंपरी—चिंचवड शहरातील एकूण २०० महाविद्यालयांचे एकूण १०००० रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले होते. वारजे माळवाडी ते येरवडा आणि पिंपरी—चिंचवड शहरातील नदी पात्रामध्ये एकुण १०,००० स्वंयसेवक व कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या सहभागातुन स्वच्छता अभियान राबवण्यात आले. डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. एन. एस. उमराणी प्र—कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. डी. कार्थिगेन, क्षेत्रीय संचालक, पुणे, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य व मा. अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. प्रभाकर देसाई, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या उपस्थितीत शनिवारवाडा पटांगणावर सदर स्वच्छता अभियानाचा समारोप झाला. |
| १७ | मा. राज्य संपर्क अधिकारी यांनी कळविल्यानुसार राष्ट्रीय समाज सुरक्षा संस्था, नवी दिल्ली यांच्यावतीने पुणे शहरातील |

| | |
|---|---|
| | महाविद्यालयीन विद्यार्थांकरिता ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी, अभियांत्रिकी महाविद्यालय, केनेडी रोड, पुणे. आणि नाशिक शहरासाठी मराठा विद्या प्रसारक समाज, कर्मवीर शांताराम बापू कोंडाजी वावरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, उत्तमनगर, सिडको, नाशिक या ठिकाणी 'व्यसनमुक्ती' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि. ४ ऑक्टोबर २०१९ रोजी, व बी.पी.एच.ई. सोसायटीचे अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर या ठिकाणी दि. १७ ऑक्टोबर २०१९ रोजी, सकाळी १० ते दुपारी ०५ या वेळेत आयोजित करण्यात आल्या होत्या. |
| १८ | मा. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा निवडणुकांमध्ये मतदार जनजागृती व मतदानाची टक्केवारी वाढवण्याकरिता स्वीप कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली. यामध्ये नवमतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करून त्यांना मतदान प्रक्रियेत सहभागी करून घेण्याकरिता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींची व Campus Ambassador ची कार्यशाळा मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि. १६ ऑक्टोबर २०१९ रोजी, मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे पुढीलप्रमाणे पुणे शहर व पुणे ग्रामीण विभागनिहाय आयोजित करण्यात आली होती. यामध्ये कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी प्रतीनिधी व कँपस अँबेसिडर उपस्थित होते. |
| १९ | युवा व क्रीडा खेल मंत्रालय, भारत सरकार यांनी उद्घोषित केल्यानुसार दि. ३१ ऑक्टोबर हा दिवस सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मदिना निमित्त 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या. राष्ट्रीय एकात्मतेत भारतीय ऐक्य, सुरक्षा व संरक्षण याकरिता सरदार वल्लभभाई पटेल यांच्या योगदानाची जाणीव आपणांस आहेच. भारतीय ऐक्य, सुरक्षा व संरक्षण या क्षेत्रामध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या योगदानाचा सन्मान म्हणून हा दिवस साजरा करण्यात येतो. दि. ३१ ऑक्टोबर २०१९ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मदिना निमित्त 'राष्ट्रीय एकता दिवस' उपक्रमाच्या आयोजनाबाबत सविस्तर परिपत्रक प्रसारित करण्यात आले होते. त्या आधारे रासेयो संलग्नीत महाविद्यालयात सर्वांना 'राष्ट्रीय एकता दिवस' शपथ देण्यात आली. तसेच पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील रासेयो संलग्नीत महाविद्यालयामध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जिवनपटावर आधारीत कार्यक्रमांचे आयोजन (उदा. वक्तृत्त्व, निबंध, पोस्टर स्पर्धा, चित्रफीत, माहितीपट, प्रदर्शन इ. उपक्रमांचे आयोजन करण्यात आले). |
| २० | मा. क्षेत्रीय संचालक, रासेयो क्षेत्रीय संचलनालय, भारत सरकार, पुणे यांनी निर्देशीत केल्यानुसार दि. २८ ऑक्टोबर ते ०२ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत दक्षता जागरूकता सप्ताहाचे आयोजन केले यामध्ये महाविद्यालयानी मा. क्षेत्रीय संचालकांनी निर्देशित केल्यानुसार शपथ आणि विविध कार्यक्रम/उपक्रमांचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आपल्या महाविद्यालयात केले होते. |
| २१ | स्वच्छ सर्वेक्षण कार्यपद्धतीमध्ये लोकशिक्षण व जनजागृती, प्रक्रिया व विल्हेवाट यासाठी अधिक प्राधान्य असून नाविन्यपूर्ण आणि उत्कृष्ट कार्य हा घटक नव्याने समाविष्ट करण्यात आलेला आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०१९ या स्पर्धेमध्ये पुणे शहराचे मानाकंन उंचावून मोठया प्रमाणावर शहरातील नागरिकांचे प्रबोधन करणे आवश्यक असल्याने यासाठी पुणे शहरातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांच्या माध्यमातून जनप्रबोधना करण्याकरिता महाविद्यालयामध्ये खालील उपक्रमांचे आयोजन केले होते.<br>१.विद्यार्थ्यांकरिता स्वच्छता प्रश्नावली मंजुषेचे आयोजन करावे.<br>२.स्वच्छ सर्वेक्षण या अनुषंगाने महाविद्यालयांच्या भिंती रंगविणे, स्टीकर चिटकवणे.<br>३.महाविद्यालयांमध्ये निंबध, वक्तृत्त्व, पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.<br>४.प्रत्येक सोमवारी महाविद्यालयांमध्ये स्वच्छता विषयक प्रतिज्ञा देण्यात आली.<br>५.स्वच्छता ॲप डाऊनलोड करण्यासाठी विद्यार्थी व पालकांचा सहभाग वाढविणे. अशाप्रकारचे उपक्रम महाविद्यालयामध्ये रासेयो स्वंयसेवकांमार्फत राबविण्यात आले. |
| २२ | पूर्व पश्चिम विभागीय प्रजासत्ताक दिन संचलन दि. ४ ते १३ नोव्हेंबर २०१९ दरम्यान उत्तर गुजरात विद्यापीठ येथे आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ५ रासेयो विद्यार्थीनी आणि ४ रासेयो विद्यार्थी असे ९ रासेयो स्वयंसेवक सहभागी होते. |
| २३ | मा. क्षेत्रीय संचालनालय, भारत सरकार, पुणे, मा. राज्यसंपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, मुंबई यांच्या निर्देशानुसार विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील सर्व लोकांमध्ये परस्पर संवाद साधून सांस्कृतिक विविधता साजरी करून सामंजस्याची समान भावना देशभर प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने 'एक भारत श्रेष्ठ भारत' अंतर्गत "महाराष्ट्र व ओडीसा" या दोन राज्यामध्ये "माहे नोव्हेंबर २०१९ ते मार्च २०२०" या कालावधीत खालील उपक्रम राबविण्यात आले होते.<br>१.दोन्ही राज्यातील भाषांचे चित्रपट भाषांतर करून दाखविले.<br>२.दोन्ही राज्यातील कला, संस्कृती, इतिहास, पर्यटन या विषयांवर व्याख्यान आयोजित करण्यात आले.<br>३.दोन्ही राज्यांमध्ये विविध सांस्कृतिक उपक्रम साजरा केले गेले.<br>४.दोन्ही राज्याचे ४० ते ५० व्हाट्सॲप ग्रुप तयार केले.<br>५.दोन्ही राज्यातील युवकांनी एकमेकांच्या भाषेमधील २० वाक्ये, ५ ते ७ विद्यार्थ्यांच्या गटाने शिकणे.<br>६.दोन्ही राज्यांसाठी घोषवाक्य लिहिणे.<br>७.दोन्ही राज्यांमध्ये व्हिडिओ कॉन्फरसिंग/स्काईप/शक्य तेथे विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर चॅट करणे.<br>८.एक पान निबंध स्पर्धा आयोजित केली.<br>९.दोन्ही राज्यामधील जेवणाचे पदार्थ एकमेकांना शिकवणे.<br>१०.दोन्ही राज्याच्या विद्यार्थ्यांनी एकमेकांच्या निवासस्थानी मुक्कामासाठी राहणे.(आदान प्रदान कार्यक्रम) |
| २४ | मा. क्षेत्रीय संचालनालय, युवा व क्रीडा खेल मंत्रालय, भारत सरकार, पुणे यांच्या पत्रानुसार "२६ नोव्हेंबर, २०१९ रोजी संविधान दिन" साजरा करण्याबाबत आणि "१४ एप्रिल, २०२० रोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जंयती" पर्यंत नागरिकांची मूलभूत कर्तव्ये, भारतीय राज्यघटना, सामाजिक–आर्थिक समानता, राष्ट्रीय सुसंवाद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान याबाबत खालील उपक्रम राबवण्यात आले.<br>१."२६ नोव्हेंबर, २०१९ रोजी संविधान दिन" निमित्त एनएनएस रॅली, जागरूकता रॅली, वादविवाद, चर्चासत्र आणि व्याख्यानाचे |

| | |
|---|---|
| | आयोजन केले.<br>२.डिसेंबर २०१९ मध्ये राज्यघटनेवर आधारित व्याख्याने/चर्चासत्राचे आयोजन केले.<br>३.जानेवारी २०२० मध्ये महाविद्यालयांमध्ये प्रश्नमंजुषा, निंबध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.<br>४.फेब्रुवारी २०२० मध्ये एनएनएस रॅली, जागरूकता रॅली, वादविवाद, चर्चासत्र आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. |
| २५ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी(MSACS) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थी व समाजामध्ये एड्स संदर्भात जनजागृती होण्याच्या दृष्टीने '१ डिसेंबर २०१९ रोजी जागतिक एड्स दिनानिमित्त सर्व रासेयो महाविद्यालयांमध्ये उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये रेड रिबन क्लब यांच्या सहकार्याने रॅली, निंबध, पोस्टर्स, भाषण, व्याख्यानमाला, चित्रकला स्पर्धा, गटचर्चा इत्यादी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून करण्यात आले आहते. |
| २६ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाने समर्थ भारत अभियान आणि महात्मा गांधीजी १५० व्या जंयती निमित्त व राष्ट्रीय सेवा योजना सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त ससून रूग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठस्तरीय रक्तदान साखळीशिबिरांचे आयोजन करण्याचे निर्धारीत केले होते. या अंतर्गत पुणे व पिंपरी–चिंचवड शहरातील सर्व महाविद्यालये सहभागी होतात आणि ससून रूग्णालयाच्या चमूबरोबर रक्तदान शिबिरांचे आयोजन करतात. त्यानुसार दि. ०२ ते ३० डिसेंबर २०१९ दरम्यान पुणे व पिंपरी–चिंचवड शहरातील महाविद्यालये सहभागी झाली होती. त्याप्रमाणे विद्यापीठस्तरीय रक्तदान शिबिर रासेयो स्वंयसेवकांनी साखळी पध्दतीने पार पडली. |
| २७ | पोलीस उपआयुक्त आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर यांच्या अहवालानुसार शहरामधील नागरिकांमध्ये ऑनलाईन व्यवहाराबाबतचे परिपुर्ण ज्ञान नसल्याने तसेच इंटरनेट बॅकिंग, ऑनलाईन ॲप्लिकेशन्स, पेमेंट पोर्टल्स या प्रकारच्या प्राथमिक सुविधांविषयी माहिती नसल्याने सायबर गुन्ह्यांचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढत आहे. नोकरी, लोन, विवाह, वस्तूंची खरेदी असे अनेक बहाणे करून नागरिकांची ऑनलाईन फसवणूक होत आहे. तसेच सोशल मिडीयावरून बदनामी, ब्लॅकमेलींग यासारख्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. यासाठी नागरीकांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयक जागरूकतेची गरज असल्याने सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचेमार्फत विविध स्तरावर नागरिकांमध्ये जागरूकता अभियान सुरू करण्यात आलेले आहे. यानुसार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता निर्माण करून दिल्यास ते याबाबत प्रतिसाद देऊन जबाबदार नागरिक बनतील आणि आपल्या पालकांना व सहकारी मित्रांना सबंधीत माहिती पटवून सांगतील. सायबर पोलीस स्टेशनमार्फत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन व्यवहार, इंटरनेट, सोशल मिडिया, ऑनलाईन बॅकींग, पेमेंट पोर्टल्स यांचा वापर कशाप्रकारे करावा, तो करताना घ्यावयाची काळजी यासंदर्भात समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहरचे सायबर गुन्ह्यांबाबतचे तांत्रिक व कायदयाचे ज्ञान असलेले पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचा कक्ष तयार करण्यात आलेला आहे. |
| २८ | मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्या पत्रानुसार पुणे शहरामध्ये दोन किलोमीटर अंतराचा प्लॅगिंग ड्राईव्ह घेण्याचे नियोजन करण्यात आले होते. तरी या उपक्रमामध्ये नागरिक, लेखक, नाटककार, खेळाडू, तसेच महानगरपालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचारी इत्यादी सहभागी झाले होते. या माध्यमातून स्वच्छ सर्वेक्षण २०२० चा प्रसार मोठया प्रमाणावर करण्यात आला. सदर उपक्रम दि. २८ डिसेंबर २०१९ रोजी, सकाळी ०७.०० ते ०९.०० या वेळेत महाविद्यालयातील रासेयो स्वंयसेवक प्लॅगेथॅान ड्राईव्हमध्ये सहभागी होण्यासाठी नदी पात्र याठिकाणी पाठवण्यात आले होते. तसेच प्लॅगेथॅान ड्राईव्हनंतर भिडे पूल, डेक्कन जिमखाना, पुणे याठिकाणी सकाळी १०.०० वाजता स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. पुणे शहरातील सर्व रासेयो महाविद्यालयातील रासेयो स्वंयसेवक स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत प्लॅगेथॅान या उपक्रमामध्ये सहभागी झाले होते. |
| २९ | सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सवित्रीबाई फुले यांचे कार्य स्मरणात राहवे या उद्देशाने त्यांच्याच जन्मदिनी विविध क्षेत्राात आपल्या कार्याचा ठसा उमटवून उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिलांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच या दिवशी विद्यार्थीनीची हिमोग्लोबिन तपासणीही केली जाणार आहे. या तपासणीकरिता डॉ.डी.वाय पाटील वैद्यकीय महाविद्यालयाकडून हिमोग्लोबिन तपासणी करणारे तज्ञ डॉक्टर यावेळी उपस्थित राहून विद्यापीठ वसतिगृहातील आणि महाविद्यालयातील विद्यार्थीनीचे हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. एन. एस. उमराणी प्र–कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मा.व्यवस्थापन परिषद सदस्यव मा. अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. प्रभाकर देसाई, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या उपस्थितीत हे शिबिर पार पडले. |
| ३० | दरवर्षी दिल्ली येथे राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलनाचे आयोजन २६ जानेवारी रोजी करण्यात येते. त्यानुसार मा. क्षेत्रीय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, क्षेत्रीय संचलनालय, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, पुणे यांनी पाठविलेल्या पत्रानुसार राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिराचे आयोजन दि. १ ते ३१ जानेवारी २०१९ या दरम्यान आंतरराष्ट्रीय युवक वसतीगृह, न्यायामार्ग, चाणक्यपुरी, नवी दिल्ली याठिकाणी आयोजित करण्यात आलेले आहे. यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे स्वयंसेवक सहभागी झालेले होते. |
| ३१ | मा. क्षेत्रीय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, क्षेत्रीय संचलनालय, युवा कार्यक्रम क्रीडा मंत्राालय, भारत सरकार, पुणे यांनी पाठविलेल्या पत्रानुसार दि. १२ ते १६ जानेवारी २०२० या दरम्यान राष्ट्रीय युवक महोत्सवाचे आयोजन लखनऊ, उत्तरप्रदेश या ठिकाणी करण्यात आले होते. या राष्ट्रीय युवक महोत्सवामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा १० विद्यार्थी, १० विद्यार्थीनी व १ संघनायक असा संघ सहभागी झाला होता. |
| ३२ | मा. क्षेत्रीय संचालनालय, भारत सरकार, पुणे, मा. राज्यसंपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, मुंबई यांच्या निर्देशानुसार विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील सर्व लोकांमध्ये परस्पर संवाद साधून सांस्कृतिक विविधता साजरी करून सामंजस्याची समान भावना देशभर प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने 'एक भारत श्रेष्ठ भारत' अंतर्गत "महाराष्ट्र व ओडीसा" या दोन राज्यामध्ये राज्याच्या विद्यार्थ्यांनी एकमेकांच्या निवासस्थानी मुक्कामासाठी राहणे.(आदान प्रदान कार्यक्रम)याअतर्गत दि. ११ जानेवारी २०२० रोजी, ओडीसा विद्यापीठामधील १० रासेयो विद्यार्थी व १ रासेयो कार्यक्रम अधिकारी अशा संघाने सावित्रीबाई फुले पुणे |

| | |
|---|---|
| | विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या AISSMS College च्या हिवाळी शिबिरात सहा दिवस सहभाग घेतला आणि या रासेयो स्वंयसेवकांचा १७ जानेवारी २०२० रोजी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना याठिकाणी सांस्कृतीक कार्यक्रम पार पडला. तसेच दि. १७ जानेवारी २०२० रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये ओडीसा आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्याचे रासेयोचे राज्य संपर्क अधिकार व विविध विद्यापीठांचे रासेयो कार्यक्रम अधिकारी यांच्या उपस्थितीत सांमजस्य करार झाला. |
| ३३ | मा. राज्यसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी पाठविलेल्या पत्रानुसार सन २०१९—२० वर्षात 'उत्कर्ष' राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे दि. २८ ते ३१ जानेवारी २०२० दरम्यान करण्यात आले होते. सदर 'उत्कर्ष' राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेत महाराष्ट्रातील १६ विद्यापीठांमधून प्रत्येकी १८ विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेचा ९स्वयंसेवक आणि ९स्वयंसेवीका व १संघनायक असा १९ जणाचा संघ सहभागी झाला होता. सन २०१९—२० 'उत्कर्ष' राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेचे या वर्षाचे सर्वसाधारण उपविजेतेपदासह सहा कलाप्रकारात पारितोषिके मिळाली. |
| ३४ | मा. राज्यसंपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, मुंबई यांच्या निर्देशानुसार पुढील राज्यस्तरीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. १.को.ए.सो.डॉ.चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालय, रोहा,जि. रायगड, मुंबई विद्यापीठ दि. १२ ते १८ जानेवारी २०२० दरम्यान फिट इंडिया याविषयावर २.यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखांदूर, जि. भंडारा येथे दि. ०२ ते ०८ फेब्रुवारी २०२०,दरम्यान एक भारत श्रेष्ठ भारत याविषयावर ३. मु.गाळणे (पुरातत्व किल्यांचे गाव) ता. मालेगाव, जि.नाशिक याठिकाणी दि. २० ते २६ फेब्रुवारी २०२०,दरम्यान "व्यसनमुक्तीकरिता युवा शक्ती" याविषयावर ४. श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुरा, जि. चंद्रपूर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दि. १७ ते २३ जानेवारी २०२० दरम्यान स्वच्छ भारत याविषयावर ५. भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि. नागपूर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे दि. २२ ते २८ जानेवारी २०२० दरम्यान एक भारत श्रेष्ठ भारत याविषयावर ६.श्री. संत गाडगे महाराज महाविद्यालय, हिंगणा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे दि. २८ जानेवारी ते ०३ फेब्रुवारी २०२० दरम्यान राज्यस्तरीय शिबिरे पार पडली अनुक्रमे सर्व राज्यस्तरीय शिबिरामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेचे रासेयो स्वयंसेवकांचे संघ सहभागी झाले होते. |
| ३५ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना सलंग्नित महाविद्यालयातील ८ रासेयो स्वंयसेवक आणि २ कार्यक्रम अधिकारी असा संघ दि. २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२० दरम्यान राज्यस्तरीय क्रिडा शिबिर, चिखलदरा, अमरावती येथे सहभागी झाला होता. |
| ३६ | मा. भारत निवडणूक आयोग, मा. उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांच्या निर्देशानुसार दि. २५ जानेवारी २०२० रोजी, १० वा राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. तसेच महाविद्यालयांमध्ये मतदार जागरूकता क्लबची स्थापना करण्यात आलेली आहे, यानुसार मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृती आणि खालील उपक्रम राबविण्यात आले.<br>प्रत्येक महाविद्यालयाने स्थापन केलेल्या निवडणूक साक्षरता क्लब (ELC) अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी युवा मतदार उत्सव साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले होते.<br>नव मतदारांना 'मतदार असल्याचा अभिमान मतदानासाठी सुसज्ज' (Proud to be a Voter Ready to Vote) हे घोषवाक्य लिहिलेले बॅचेस वितरण करणे. नवीन मतदारांच्या जागृतीसाठी संसाधन पुस्तकातील एखादा उपक्रम आयोजित केले. भावी मतदारांसाठी संसाधन पुस्तकातील एखादा उपक्रम आयोजीत करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धाचे आयोजन केले गेले. |
| ३७ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व "आई फाउंडेशन विश्वास आधाराचा" यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक या ठिकाणी प्रथमच फ्लॅश मॉब डान्स परफॉर्मन्सद्वारा दि. २६ जानेवारी २०२० रोजी, अडीच हजारापेक्षा जास्त विद्यार्थी राष्ट्रीय एकात्मतेसाठी एकत्रित येऊन समाजाला मानवतेचा आणि सत्याचा संदेश नृत्याद्वारे देण्यात आली. |
| ३८ | मा. क्षेत्रीय संचालक, क्षेत्रीय संचालनालय, युवा व क्रीडा खेल मंत्रालय, भारत सरकार, पुणे यांच्या निर्देशानुसार 'एक भारत श्रेष्ठ भारत' अंतर्गत "महाराष्ट्र व ओडीसा" या दोन राज्यामध्ये "माहे १ जानेवारी ते ३० जुन २०२०"या कालावधीत प्रश्नमंजुषा (Quiz Competition) हा उपक्रम महाविद्यालयामध्ये राबविण्यात यावे असे सूचित केले होते. या उपक्रमाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय अभिमानाची व राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करणे हा मुख्य उद्देश होता. त्यानुसार महाविद्यालयामध्ये प्रश्न मंजुषा उपक्रम राबविण्यात आले होते. |
| ३९ | मा. क्षेत्रीय संचालक, क्षेत्रीय संचालनालय, युवा व क्रीडा खेल मंत्रालय, भारत सरकार, पुणे यांच्या निर्देशानुसार मुलींच्या सुरक्षिततेबाबत संवेदनशीलता आणि जनजागृती करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने "दि. २४ जानेवारी २०२० रोजी, राष्ट्रीय बालिका दिन" साजरा करावयाचा असे परिपत्रकामार्फत सूचित करण्यात आले होते यामध्ये महिला सबलीकरण, बेटी बचाओ बेटी पढाओ, महिला क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिलांचा कार्यक्रम आणि त्यांचा सत्कार अशा स्वरूपाचे कार्यक्रम या दिवशी रासेयो महाविद्यालयामध्ये राबविण्यात आले. |
| ४० | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व "आई फाउंडेशन विश्वास आधाराचा" यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक या ठिकाणी दि. २३ फेब्रुवारी २०२० रोजी, विविध उपक्रमाचे आयोजन नाशिक शहरात करण्यात आले होते. दि. २७ फेब्रुवारी २०२० हा दिवस कवी वि. वा. शिरवाडकर "कुसुमाग्रज" यांचा जन्मदिवस "मराठी राजभाषा दिवस" म्हणून संपूर्ण भारतात साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधुन दि. २३ फेब्रुवारी २०२० या दिवशी कवी संमेलन/काव्य वाचन स्पर्धा/ एकपात्री गायन स्पर्धा/समूह नृत्य स्पर्धा आणि वत्कृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. |
| ४१ | मा. राज्यसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी पाठविलेल्या पत्रानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व सर परशुरामभाऊ महाविद्यालय, टिळक रोड, पुणे |

| | |
|---|---|
| | यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ ते २२ फेब्रुवारी २०२० दरम्यान एक भारत श्रेष्ठ भारत शिबिराचे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ दत्तक गाव मु. पो.वाघापूर, ता. पुरंदर, जि. पुणे या ठिकाणी करण्यात आले होते. या शिबिरास संपुर्ण राज्यातून एवढे ३०० रासेयो स्वंयसेवक उपस्थित होते. |
| ४२ | मा. राज्यसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी पाठविलेल्या पत्रानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व डॉ.डी.वाय.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पिंपरी आणि डॉ.डी.वाय.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आकुर्डी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ ते २३ फेब्रुवारी २०२० दरम्यान राज्यस्तरीय स्वच्छ भारत अभियान निसर्ग संर्वधन शिबिराचे आयोजन रतनवाडी कळसूबाई हरिशचंद्र गड अभियारण्य ता. अकोले, जि. अहमदनगर या ठिकाणी करण्यात आले होते. या शिबिरास संपुर्ण राज्यातून एवढे ३०० रासेयो स्वंयसेवक उपस्थित होते. |
| ४३ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविले जात आहेत. राज्य व केंद्र शासनाच्या आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन हेही विशेष महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील गड, किल्ले, ऐतिहासिक स्थळे व इमारती दत्तक घेऊन या स्थळांना असलेले ऐतिहासिक महत्त्व, या स्थळांची स्वच्छता अशा माध्यमातून या ऐतिहासिक स्थळांचा जिर्णोद्धार करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत गडसंवर्धन व निसर्ग संगोपनासाठी एक दिवसीय श्रमसंस्कार व स्वच्छता अभियान शिबिराचे आयोजन दि. २३ फेब्रुवारी २०२० रोजी किल्ले सिंहगड, ता. हवेली, जि. पुणे याठिकाणी केले होते. डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ.एन.एस.उमराणी प्र—कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मा.व्यवस्थापन परिषद सदस्य व मा. अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. प्रभाकर देसाई, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या उपस्थितीत हे शिबिर पार पडले. या शिबिरास पुणे व पिंपरी—चिंचवड शहरातील रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. |
| ४४ | कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या सार्वत्रिक संकटाचा सामना करताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करत आहेत. फेस मास्क तयार करून वितरण करणे, मदत साहित्य संकलन व वितरण करणे, रक्तदात्या विद्यार्थ्यांची सूची तयार करणे, परिसरातील दहा कुटुबांना आधार देण्यासाठी त्यांचे पालकत्व स्वीकारणे अशा अनेक स्वरूपात रासेयो स्वयंसेवक करत आहेत. |
| ४५ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आषाढी वारीनिमित्त दरवर्षी स्वच्छ वारी स्वस्थवारी निर्मल वारी हरित वारी आयोजित करते. कोविड १९ मुळे ह्यावर्षी शासकीय स्तरावरावरून वारीमार्गावर प्रत्यक्ष वारीचे नियोजन संस्थगित करण्यात आले होते. तरीही १६ वर्षांची परंपरा असलेल्या स्वच्छ वारी निर्मल वारी हरित वारी बाबत राष्ट्रीय सेवा योजना विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला ह्याही वर्षी एस.पी.पी.यु.एन.एस.एस. दिंडी ऑनलाईन व काही उपक्रम लॉकडाऊनचे नियम पाळून यशस्वीरित्य पार पाडले गेले. यामध्ये स्वच्छ वारी:अतंर्गत स्वच्छता व निर्जतुकीकरण तसेच कोविड १९ बाबत गैरभाव व गैरसमजूती जागरण केले, स्वस्थ वारी: रक्तदान आणि रासेयो कडून निर्देशित सर्वेक्षण फॉर्मद्वारे आरोग्य सर्वेक्षण करण्यात आले, निर्मल वारी: उघडयावर शौच प्रतिबंध व उघडयावर थुंकणे प्रतिबंध उद्बोधन व प्रबोधनपर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन केले, हरित वारी उपक्रमांतर्गत 'करू वृक्षलागवड: लावू एकतरी देशी फळझाड' अशा उपक्रमांच्यांमाध्यमातुन यावर्षीची दिंडी पार पडली. |

प्रसार माध्यमांचा उपयोग : वृत्त, लेख, मुलाखत संबंधित माहिती.. . . . . . . . .. . . . . . . . . . . . . .

**रासेयो कार्याचे आर्थिक मूल्यांकन** :

नियमित कार्यक्रम : रु.. 2,00,00,000/- विशेष शिबिरे : रु. 1,90,00,000 इतर कायर्क्रम : रु. 75,00,000

रासेयो अनुदान तपशील :

राज्य सरकार: नियमित कार्यक्रम : रु.1,19,37,500/-. विशेष शिबिरे : रु. 1,07,43,750/-

विद्यापीठ (स्वयंनिर्वाही एकक): नियमित कार्यक्रम : रु. 32,50,000/-, विशेष शिबिरे:रु. 29,25,000/-

इतर माध्यम (विद्यापीठ निधी अर्थसहाय्य): नियमित कार्यक्रम : रु. 40,75,000/- विशेष शिबिरे : रु. 50,00,000/-

**संपर्क** :

| जिल्हा | जिल्हा समन्वयक नांव | भ्रमणध्वनी | कार्यालय | फॅक्स | ई मेल |
|---|---|---|---|---|---|
| पुणे शहर | डॉ. विलास उगले | ९४२२७३५५६९ | | | viugale@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पुणे शहर | डॉ. सविता कुलकर्णी | ७७२००३६७७४ | | | s.kulkarni72@yahoo.com |
| पुणे शहर | डॉ. शिवाजी पाचारणे | ९८२२६२६७७८ | | | shivajirpacharane@gmail.com |
| पुणे शहर | डॉ. भारत राठोड | ८३८००६६८६७ | | | rathodbv26@gmail.com |
| पुणे ग्रामिण | डॉ. श्रीकांत फुलसुदंर | ९८६०२८६४११ | | | shrikantmf123@yahoo.com |
| पुणे ग्रामिण | डॉ. विशाल गायकवाड | ९८६०४०२३६५ | | | vgaikwad888@gmail.com |
| पुणे ग्रामिण | डॉ. विलास कर्डिले | ९८६०३८८३८३ | | | kardilev@gmail.com |
| अहमदनगर | डॉ. प्रताप फलफले | ९४२२३२६३४९ | | | pjphalphale@gmail.com |
| अहमदनगर | डॉ. शैलेंद्र बनसोडे | ९२२६३२२०८२ | | | bansodeshailendra15@gmail.com |
| अहमदनगर | प्रा. भारती मुरलीधर दानवे | ९४०३७१०००० | | | bharati.gaikwad@rediffmail.com |
| नाशिक | डॉ. रविंद्र आहिरे | ९७६५२१९४२२ | | | rahire1982@gmail.com |
| नाशिक | डॉ. डी. के. आहेर | ९४२१५०१५३० | | | dkaher1966@gmail.com |
| नाशिक | प्रा. पुष्कर पाडेकर | ९८२३६०५००१ | | | push.pushkar@gmail.com |
| कार्यक्रम समन्वयक नांव व पत्ता | डॉ. प्रभाकर देसाई, गणेशखिंड, पुणे, ४११००७ | ९८८१९०८०२० | | | nss@unipune.ac.in<br>nss@pun.unipune.ac.in<br>desaicritic@gmail.com |

विविध कार्यशाळांची माहिती :-----------------------------------------------------------

समाविष्ट न झालेल्या उपक्रमांची माहिती (संक्षिप्त स्वरूपात)

-----------------------------------------------------------------------------------

छायाचित्रे : नियमित व विशेष शिबिरांच्या माध्यमातून झालेल्या कार्याचे निवडक 5 छायाचित्रे (टिपासहीत) पाठवावीत.

कार्यक्रम

समन्वयकाची स्वाक्षरी